महाराष्ट्र शासन
प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org

क्रमांक : बैठक-१८२४/प्र.क्र. ३७६/प्रनिप्रा/२०जानेवारी/२०२५/ 49    दिनांक : 03 FEB 2025

## :: बैठकीचे इतिवृत्त ::

**मा. न्या. विजय एल. अचलिया (से.नि.), अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण (अतिरिक्त कार्यभार)** यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी दुपारी १२:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त,-

सदरील बैठकीस प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, २) डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, व ३) श्री. दिलीप सरदेसाई (भा.प्र.से.), सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. यांच्या वतीने डॉ. रुपेश राऊत, सह संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, मुंबई व २) श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या वतीने १) डॉ. वाय.सी. साळे, संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे हे उपस्थित होते.

तसेच १) डॉ. वाय.सी. साळे, संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, २) डॉ. विवेक पाखमोडे, सह संचालक - दंत विभाग, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ३) डॉ. रुपेश राऊत, सह संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, मुंबई, ४) श्री. महेंद्र कोठावदे, उप-कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, ५) डॉ. दिनकर केकाण, विशेष कार्य अधिकारी, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, ६) डॉ. किशोर मडावी, सहा. प्राध्यापक, आयुष संचालनालय, मुंबई व ७) डॉ. संदिप काळे, सहा. प्राध्यापक, आयुष संचालनालय, मुंबई हे संबंधित संचालकांच्या वतीने विशेष निमंत्रित म्हणुन प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित होते.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

## भाग – २ (शैक्षणिक विभाग)

**विषय क्रमांक ८ : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रवेश मान्यता प्रस्ताव / पुनर्विलोकन अर्ज प्राप्त महाविद्यालयांचे (एकुण १३९ महाविद्यालये) प्रवेश मान्यता प्रस्ताव मान्यतेबाबत. (संदर्भ:- प्राधिकरणाच्या दिनांक १८/१२/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ४ मधील निर्देश).**

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील ज्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी/संस्थांनी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव दिरंगाईने सादर केला, याबाबत सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी सादर केलेल्या माहितीची नोंद घेण्यात आली. सदरील माहितीचा तपशील खालील प्रमाणे आहे,-

| Sr. No | Name of the Course | No. of Institutes | Sanctioned Intake | Total admitted | Vacancy | Verification Report of Directorate | | | Remarks, If any |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | Recommended for Approval | Not Recommended for Approval | Admission Cancelled | |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) |
| **Technical Education** | | | | | | | | | |
| 1 | M. Engineering / M.Tech | 2 | 21 | 14 | 7 | 13 | 0 | 1 | |
| 2 | M. Pharmacy | 2 | 42 | 38 | 4 | 38 | 0 | 0 | |
| 3 | MBA/MMS | 6 | 688 | 438 | 250 | 432 | 5 | 1 | |
| 4 | MCA | 3 | 270 | 102 | 168 | 102 | 0 | 0 | |
| 5 | B. Engineering /B.Tech | 7 | 2341 | 1325 | 1016 | 1321 | 3 | 1 | |
| 6 | B. Pharmacy | 26 | 2460 | 945 | 1515 | 939 | 5 | 1 | |
| 7 | Pharm D | 1 | 33 | 15 | 18 | 14 | 0 | 1 | |
| 8 | B. Architecture | 1 | 44 | 11 | 33 | 11 | 0 | 0 | |
| 9 | DSE (Direct Second Year Degree Engineering) | 6 | 872 | 534 | 338 | 521 | 13 | 0 | |
| 10 | DSP (Direct Second Year Degree Pharmacy) | 20 | 743 | 619 | 124 | 613 | 3 | 3 | |
| Total (A) | | 74 | 7514 | 4041 | 3473 | 4004 | 29 | 8 | |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| Sr. No | Name of the Course | No. of Institutes | Sanctioned Intake | Total admitted | Vacancy | Verification Report of Directorate | | | Remarks, If any |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | Recommended for Approval | Not Recommended for Approval | Admission Cancelled | |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) |
| **Higher Education** | | | | | | | | | |
| 1 | LLB – 3 | 5 | 540 | 552 | 31 | 547 | 3 | 2 | |
| 2 | LLB – 5 (Integrated) | 2 | 120 | 56 | 70 | 55 | 0 | 1 | |
| 3 | M.P.Ed. | 1 | 30 | 30 | 0 | 30 | 0 | 0 | |
| 4 | B.Ed. | 2 | 150 | 73 | 77 | 73 | 0 | 0 | |
| 5 | B.P.Ed. | 2 | 200 | 121 | 79 | 106 | 12 | 3 | |
| 6 | BA/BSc – B.Ed. (Integrated) | 1 | 80 | 9 | 71 | 9 | 0 | 0 | |
| | TOTAL (B) | 13 | 1120 | 841 | 328 | 820 | 15 | 6 | |
| **AYUSH Education** | | | | | | | | | |
| 1 | PGA | 11 | 2043 | 2018 | 25 | 1955 | 61 | 2 | |
| 2 | B.A.M.S. | 28 | 610 | 603 | 7 | 586 | 16 | 1 | |
| 3 | B.H.M.S. | 8 | 272 | 266 | 6 | 260 | 6 | 0 | |
| | TOTAL (C) | 47 | 2925 | 2887 | 38 | 2801 | 83 | 3 | |
| **Medical Education** | | | | | | | | | |
| 1 | PGM | 1 | 3 | 3 | 0 | 3 | 0 | 0 | |
| 2 | B.Sc. Nursing | 4 | 130 | 105 | 25 | 103 | 0 | 2 | |
| | TOTAL (D) | 5 | 133 | 108 | 25 | 106 | 0 | 2 | |

| GRAND TOTAL (A+B+C+D) | 139 | 11692 | 7877 | 3864 | 7731 | 127 | 19 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

प्रस्तूत प्रकरणी संबंधित संचालकांनी सादर केलेल्या प्रवेश पडताळणी / छाननी अहवालानुसार एकुण ७८७७ प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ७७३१ विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना मान्यतेकरिता शिफारस केलेली आहे. उपरोक्त तक्त्यातील रकाना क्रमांक (७) मध्ये नमूद ७७३१ संबंधित संचालकांनी शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. उपरोक्त तक्त्यातील रकाना क्रमांक (९) मध्ये प्रवेश रद्द झालेल्या १९ विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना मान्यता देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच रकाना क्रमांक (८) मध्ये नमूद १२७ विद्यार्थ्यांच्या प्रवेशामध्ये त्रुटी असल्याबाबत संबंधित संचालकांनी त्यांच्या

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

अहवालात नमूद केले आहे. या १२७ विद्यार्थ्यांच्या त्रुटी **प्रपत्र-ब** मधील तक्त्यात संबंधित महाविद्यालयांच्या नावासमोर रकाना क्रमांक (१६) मध्ये नमूद करण्यात आले आहे. या विद्यार्थ्यांच्या त्रुटींबाबत संबंधित विद्यार्थी / महाविद्यालय यांना कळविण्यात यावे. सदरील त्रुटींबाबत संबंधित महाविद्यालयास कळविण्यात आल्यापासून १५ दिवसांत त्यांची पूर्तता संबंधित महाविद्यालय / विद्यार्थी यांनी करणे बंधनकारक राहील. अशा विद्यार्थ्यांच्या संदर्भात त्रुटींची पूर्तता केलेल्या व न केलेल्या प्रवेशांचा अहवाल प्राधिकरणा समोर निर्णयाकरिता सादर करावा.

**विषय क्रमांक ९ : मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ७(घ) मधील निर्देशानुसार संबंधित संचालकांनी सादर केलेल्या फेर पडताळणी अहवालानुसार प्रवेश मान्यतेबाबत अभ्यासक्रम-निहाय प्रकरणे निर्णयाकरिता सादर (संदर्भ:- प्राधिकरणाच्या दिनांक १८/१२/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ५ मधील निर्देश).**

प्रस्तूत प्रकरणी चर्चा करण्यात येऊन सदरील विषय प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

**विषय क्रमांक १०: शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत (संदर्भ:- प्राधिकरणाच्या दिनांक १८/१२/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ८ मधील निर्देश).**

मान. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ७/१०/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक १ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये खालील महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश अपूर्ण कागदपत्रे असल्याने प्राधिकरणाच्या दिनांक २१/०८/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये ना मंजुर करण्यात आलेले होते, या संदर्भात प्राधिकरणाच्या दिनांक ७/१०/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार संबंधित महाविद्यालयाना आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्याकरिता प्राधिकरणाद्वारे स्वतंत्र पत्राद्वारे कळविण्यात आले होते. महाविद्यालयांचा तपशील पुढील प्रमाणे आहे,-

| Sr. No. | Course Name | College Code | College Name | No. of admissions are NOT Approved by the Authority |
|---|---|---|---|---|
| 1. | MBBS | 1112 | MIMER Medical College, Mawal, Talegaon Dabhade, Pune | **22** |
| 2. | MBBS | 1261 | Dr Rajendra Gode Medical College, Amravati | **22** |
| 3. | MBBS | 1362 | Parbhani Medical Colleg, Parbhani | **21** |
| 4. | BDS | 2116 | DYP Dental School, Haveli, Pune | **15** |
| 5. | BDS | 2118 | Pandit Deendayal Upadhyay Dental College, Solapur | **15** |
| 6. | BDS | 2127 | Yogita Dental College, Khed, Ratnagiri | **15** |
| 7. | BDS | 2134 | YCM Dental College, Ahmednagar | **15** |
| 8. | BDS | 2229 | Dr. Rajesh Kambe Dental, Barshitakli, Akola | **15** |
| 9. | BDS | 2331 | Aditya Dental, Beed | **16** |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

| Sr. No. | Course Name | College Code | College Name | No. of admissions are NOT Approved by the Authority |
|---|---|---|---|---|
| 10. | PGM | 1112 | MIMER Medical College, Mawal, Talegaon Dabhade, Pune | **13** |
| 11. | MDS | 2116 | D.Y. Patil Dental School, Haveli, Pune | **02** |
| 12. | MDS | 2118 | Pandit Deendayala Upadhay Dental College, Solapur | **03** |
| 13. | MDS | 2127 | Yogita Dental College, Khed, Ratnagiri | **05** |
| 14. | MDS | 2134 | YCM Dental College, Ahmednagar | **04** |
| 15. | MDS | 2229 | Dr. R.R. Kambe Dental College, Akola | **04** |
| 16. | MDS | 2331 | Aditya Dental College, Beed | **03** |
| | **Total :** | | | **190** |

प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी प्राधिकरण स्तरावर करण्यात आली होती. तथापि प्राधिकरणाच्या निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमांस संस्थात्मक / व्यवस्थापन कोटयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी संबंधित महाविद्यालयांनी सादर केलेली माहिती / कागदपत्रे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी त्यांच्या प्रतिनिधीमार्फत पुनःश्च तपासणी / छाननी करुन त्यांचा अहवाल प्राधिकरणास सादर करण्याचा निर्णय प्राधिकरणाच्या दिनांक १८/१२/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ८ अन्वये घेण्यात आला होता.

प्राधिकरणाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या प्रतिनिधींनी संबंधित १६ व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमास संस्थात्मक / व्यवस्थापन कोटयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची तपासणी / छाननी करुन दिनांक ३०/१२/२०२४ रोजी अहवाल सादर केला आहे.

सदरील अहवालाचे अवलोकन करुन त्यावर सांगोपांग चर्चा करण्यात आली. तथापि प्राप्त अहवालानुसार उक्त तालिकेतील नमूद शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमांस संस्थात्मक / व्यवस्थापन कोटयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी ज्या प्रवेशांना पात्रतेकरिता शिफारस केली आहे, अशा प्रवेशित १९० विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली. (महाविद्यालय/अभ्यासक्रम निहाय विद्यार्थ्यांची यादी : प्रपत्र-क). सदरील विद्यार्थ्यांच्या प्रवेश पात्रते संबंधी पुढील उचित कार्यवाही करण्याबाबत कार्यालयाद्वारे विद्यापीठास कळविण्यात यावे, असे निर्देश देण्यात आले.

**विषय क्रमांक ११ : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंतच्या विविध व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राप्त झालेले पुनर्विलोकन अर्जांवर निर्णय घेणे.**

प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयांनी सादर केलेल्या पुनर्विलोकन अर्जांचा तपशील सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी प्राधिकरणास सादर केला. या संदर्भात सांगोपांग चर्चा करण्यात आली.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

ज्या पुनर्विलोकन अर्जांमध्ये महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या प्रवेशा संदर्भात आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे, अशा प्रकरणी पुनर्विलोकन अर्ज ग्राह्य धरुन सदरील अर्जातील नमूद विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना मान्यता प्रदान करण्याचे ठरविले.

तथापि वैद्यकीय व आयुष शिक्षण अभ्यासक्रमाशी संबंधित प्रकरणे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या तपासणी / छाननी अहवालानुसार पात्र ठरणाऱ्या प्रवेशांना तसेच प्राधिकरण कार्यालयाने इतर विभागांशी संबंधित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांची तपासणी / छाननी करुन सादर केलेल्या अहवालानुसार ज्या प्रवेश प्रकरणी पात्रतेची शिफारस केली आहे, अशा प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे (<u>प्रपत्र-ड</u>).

तसेच, ज्या पुनर्विलोकन अर्जासोबत विद्यार्थ्यांच्या प्रवेशातील त्रुटी संदर्भात आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली नाही , अशा पुनर्विलोकन आवेदनकर्त्यांना (<u>प्रपत्र-इ</u>) मान. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण / सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्या समोर सुनावणीची संधी देऊन सदर प्रकरणी पुढील निर्णयाकरिता प्राधिकरणास सादर करण्यात यावे, असे ठरले.

**<u>विषय क्रमांक १२:</u> <u>मान. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.</u>**

**(क) <u>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील MBA (LE) व MCA (LE) या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रक्रिया शुल्क आकारणीबाबत.</u>**

विषयांकित प्रकरणी सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले. सदर प्रस्तावात MBA (LE) व MCA (LE) या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया नव्यानेच चालु झाली असून सर्व प्रवेश संस्था स्तरावरुन करण्याची प्रवेश नियमावलीमध्ये तरतूद आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधिल LE या अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांमध्ये संस्थात्मक स्तरावर प्रवेश दिले गेले आहेत. त्यामुळे प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क प्रति प्रवेशित विद्यार्थी रु. २०००/- घेण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले होते.

तथापि सदर प्रकरणी सांगोपांग चर्चा करुन शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील MBA (LE) व MCA (LE) या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक ७/१०/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ३(क) नुसार निश्चित करण्यात आलेल्या सुत्रानुसार "प्रक्रिया शुल्क" भरणा करणे संबंधित अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना बंधनकारक राहील, याबाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. प्रस्तूत प्रकरणी प्राधिकरण कार्यालयाने उचित कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले.

**(ख) <u>पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनियरींग ॲण्ड रिसर्च, पुणे येथील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच प्रवेशित कु. शिवेंद्र जाधव यांनी रद्द केलेला प्रवेश नियमित करण्याबाबत.</u>**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनियरींग ॲण्ड रिसर्च, पुणे या महाविद्यालयात कु. शिवेंद्र जाधव, (EN२४३१९०६१) प्रथम वर्ष अभियांत्रिकी या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्याने विहीत कालावधीत नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्याचा प्रवेश पोर्टलवर रद्द केलेला आहे.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

सदर विद्यार्थ्याने त्याचे नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र दिनांक ८/०९/२०२४ या प्रवेशाच्या दिवशी महाविद्यालयात सादर केलेले आहे. परंतू सदर प्रमाणपत्र संबंधीत पोर्टलवर अनावधानाने अपलोड करावयाचे राहून गेले आहे. सदर विद्यार्थ्यास त्याचा महाविद्यालयात ROLL NO. नसल्यानंतर प्रवेश रद्द झाला असल्याचे समजले, याप्रकारे रद्द झालेला प्रवेश नियमित करण्याची विनंती कु. शिवेंद्र जाधव यांनी विषयांकित अर्जान्वये केलेली आहे. प्रथम वर्ष अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाची प्रवेश बंद दिनांक २३/१०/२०२४ अशी होती. तसेच SEBC प्रवर्गातून प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांना नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करावयाची दिनांक ९/०९/२०२४ होती.

सदर विद्यार्थ्याने प्रवेश घेतेवेळी दिनांक १/०८/२०२४ रोजीचे नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्राची मुळ प्रत दिनांक ८/०९/२०२४ रोजी महाविद्यालयात दिलेली आहे, असे विद्यार्थ्याचे निवेदन होते. महाविद्यालय व विद्यार्थ्याकडून सदर प्रमाणपत्र ऑनलाईन अपलोड करावयाचे राहून गेले असल्याने सदर विद्यार्थ्याचा प्रवेश ऑनलाईन रद्द झालेला आहे. सदर रद्द झालेला प्रवेश नियमित ठेवण्याची विनंती विद्यार्थ्याने तसेच पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनियरींग ॲण्ड रिसर्च, पुणे यांनी दिनांक १२/१२/२०२४ रोजीच्या ईमेलद्वारे कु. शिवेंद्र जाधव, (EN२४३१९०६१) प्रथम वर्ष अभियांत्रिकी या अभ्यासक्रमाचा प्रवेश नियमित/सुरक्षित करणेबाबत विनंती केली आहे.

प्रस्तूत प्रकरणी प्राप्त अर्ज हा विद्यार्थ्यामार्फत प्राप्त झाला असून या प्रकरणी महाविद्यालयाचे अभिप्राय / खुलासा प्राप्त होणे आवश्यक असल्याचे मत सदस्यांचे आहे. त्यानुसार सदरील खुलासा प्राप्त झाल्यावर सीईटी कक्षास पाठवुन प्रस्तूत प्रकरणी आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी त्यांचे अभिप्राय प्राधिकरणास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

(ग) <u>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पदवी / पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रिया व तद्नुषंगाने प्रवेशित विद्यार्थ्यांची प्राधिकरण स्तरावर छाननी / पडताळणी करण्याकरिता उपसमिती गठित करण्याबाबत.</u>

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ कलम ९(२)(दोन) मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंत च्या प्रवेश प्रकरणी तत्कालीन मान. अध्यक्ष महोदय यांच्या निर्देशानुसार एकूण प्रवेश मान्यता प्रस्तावांपैकी १% निवडक प्रवेश मान्यता प्रस्तावांतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची/प्रवेश प्रक्रियेची प्रत्यक्ष छाननी/पडताळणी करण्याबरोबरच संबंधित संचालकांच्या तपासणी अहवालानुसार त्रुटी असलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची प्रत्यक्ष छाननी/ पडताळणी करण्यात आलेली आहे.

वरील प्रक्रियेकरिता शैक्षणिक वर्षासाठी विभाग निहाय उपसमिती गठित करण्यात आलेली होती. त्यापैंकी मागील शैक्षणिक वर्षामध्ये दिनांक ०८/०१/२०२४ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये १) प्राधिकरणाचे अशासकीय सदस्य (उच्च्, तंत्र, कला व कृषी अभ्यासक्रमांकरीता) व वैद्यकीय आणि आयुष अभ्यासक्रमांकरिता प्राधिकरणाचे सदस्य तथा कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली, २) सदस्य सचिव तथा आयुक्त हे सदस्य पदी व उपसमितीस सहाय्य करण्याकरिता ३) समन्वयक म्हणुन प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांची उपसमिती गठित करण्यात आली होती.

सद्यस्थितीमध्ये अधिनियम २०१५ मधील कलम ७(३) मधील तरतूदींनुसार नियमित अशासकीय ०२ सदस्यांची नियुक्ती झालेली नाही. तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील बहुतांशी व्यावसायिक पदवी /

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया पुर्ण झालेल्या असून संचालनालय स्तरावर संबंधित अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या तपासणी / छाननीची प्रक्रिया करुन महाविद्यालयांमार्फत प्रवेश मान्यता प्रस्ताव प्राधिकरणास प्राप्त होत आहेत.

वरील बाबी विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी तसेच अधिनियम २०१५ मधील तरतूदींस अनुसरुन प्राप्त होणाऱ्या एकुण प्रस्तावांपैकी १ टक्के प्रस्तावातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या कागदपत्रांची छाननी/पडताळणी करण्यासाठी अभ्यासक्रम/विभाग-निहाय पुढील प्रमाणे उपसमिती गठित करण्यात येत आहे. त्यानुसार खालील उपसमितीने कार्यवाही करुन प्राधिकरणास अवगत करावे.

**उपसमिती – अ / (तंत्र शिक्षण, उच्च शिक्षण व कला शिक्षण)**

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | उपसमितीतील पद |
|---|---|---|
| १. | डॉ. एस.के. महाजन,<br>माजी सह संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई व माजी परिक्षा समन्वयक, तंत्र शिक्षण विभाग, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई. | अध्यक्ष |
| २. | श्री. तुषार शिंदे,<br>कक्ष अधिकारी,प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई | सदस्य |
| ३. | श्री. एस.के. कविटकर,<br>सहाय्यक कक्ष अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई | सदस्य सचिव |

**उपसमिती – ब / (वैद्यकीय शिक्षण व आयुष शिक्षण)**

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | उपसमितीतील पद |
|---|---|---|
| १. | डॉ. पी.एच. शिनगारे,<br>माजी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई. | अध्यक्ष |
| २. | डॉ. आर.एस. बंगाळ,<br>मान. सदस्य, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक | सदस्य |
| ३. | श्री. तुषार शिंदे,<br>कक्ष अधिकारी,प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई | सदस्य |
| ४. | श्री. विजय बा. भिंगारे,<br>सहाय्यक कक्ष अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई. | सदस्य सचिव |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

## उपसमिती – क / (कृषी शिक्षण)

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | उपसमितीतील पद |
|---|---|---|
| १. | डॉ. बाळासाहेब पवार,<br>माजी सहयोगी प्राध्यापक, कृषी अर्थशास्त्र, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी, अहिल्यानगर. | अध्यक्ष |
| २. | श्री. तुषार शिंदे,<br>कक्ष अधिकारी,प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई. | सदस्य |
| ३. | श्री. विजय बा. भिंगारे,<br>सहाय्यक कक्ष अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई. | सदस्य सचिव |

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(न्यायमुर्ती विजय एल. अचलिया (से.नि.))
अध्यक्ष,
(अतिरिक्त कार्यभार)
प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 03 FEB 2025